# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

**दिनांक : ०१/१०/२०२४**

## प्रेसनोट

मतदार नोंदणी अधिकारी १४१ उल्हासनगर महानगरपालिका विधानसभा मतदार संघ तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडील क्र. निवडणूक/कक्ष-१/टे-१/कावि-१११/२०२१ दि.१६/०९/२०२४ रोजीच्या पत्रात नमुद केल्यानुसार निवडणूक विषयक प्रचार प्रसिध्दी करणे कामी प्रत्येक महाविदयालयामध्ये Campus Ambassadors व Co-ordinoator यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यास अनुसरून दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी पहिला मजला नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे जिल्हास्तरीय कार्यशाळा देखील आयोजित करण्यात आली होती.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती पाहता आज दि. ३०/०९/२०२४ रोजी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील संबंधित यांची सकाळी ठीक ११.३० वा. श्री. किशोर गवस, अतिरिक्त आयुक्त (२) यांच्या दालनामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे अधिकारी व Campus Ambassadors व Co-ordinoator उपस्थित होते.

१. विशाल कदम,निवडणूक विभागप्रमुख
२. प्रियुशी बोस, C.H.M College, Co-ordinoator
३. आरती गुडेकर, C.H.M College, Ambassador
४. विश्वजीत विनकर, C.H.M College, Ambassador
५. वरद नांदगामे, C.H.M College, Ambassador
६. सचिन धर्माधिकारी, C.H.M College, Ambassador
७. प्रमोद दगडे, R.K.T College, Co-ordinoator

उपरोक्त बैठकीमध्ये उपस्थित महाविदयालयांच्या प्रतिनिधींना खालीलप्रमाणे सुचना देण्यात आल्या आहेत.

१. मा. निवडणुक आयोगामार्फत प्राप्त निर्देशास अनुसरून मतदार नोंदणी आणि मतदान जनजागृती बाबत आपल्या महाविदयालयातील विदयार्थ्यांदवारे सर्वतोपरी प्रयत्न करणे.

२. निवडणूक आयोगाकडील प्रचार/प्रसार साहित्याचा वापर करून निवडणूक विभागामार्फत उपलब्ध करण्यात आलेल्या कमी मतदान झालेल्या केंद्राच्या परिसरामध्ये मतदार नोंदणी व मतदान विषयक जनजागृतीचे कार्यक्रम करावे.

३. प्रभातफेरी/रॅली/पालकसभा/कॅम्पसमिटींग्ज/पथनाटय/सोशलमिडी याया व इतर अभिनव मार्गांनी मतदार नोंदणी कशी करावी (फॉर्मक्र ६ ऑनलाईन व ऑफलाईन भरणे), मतदान कसे करावे.(इव्हिएम साक्षरता) याबाबत जागरूकता करावी.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.